दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.१० नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ८० | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 10 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 80 | Pages 4 | Rate 4 Rs

मी कुठलीही चुकीची गोष्ट होऊ देत नाही

मुंबई–आपण पारदर्शकपणे काम करत असताना, केवळ राजकीय हेतुने बदनामी केली जाते, याचे दुःख त्यांनी व्यक्त केले. सकाळपासून रात्रीपर्यंत लोकांची कामं करायची. पारदर्शकता कशी राहील ते बघायचे. नियमाला धरून सगळे करायचे... चूक होणार नाही त्याची काळजी घ्यायची आणि लगेच बारामतीतील कुठल्या कुठल्या जमिनीचे काहीही काढायला लागले, असे ते म्हणाले. तसेच माझ्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाल्यापासून मी कुठलीही चुकीची गोष्ट होऊ देत नाही, असेही त्यांनी विरोधकांना ठणकावून सांगितले.

लाडकी बहीण योजनेतील महिलांसाठी महत्त्वाची बातमी; केवायसीची अंतिम तारीख १८ नोव्हेंबर

परिस्थिती पाहून मुदतवाढ देण्याचा निर्णय–आदिती तटकरे

मुंबई (वृत्तसंस्था)–राज्यातील महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना सरकारकडून मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या योजनेत महिलांना दरमहा आर्थिक सहाय्य दिले जाते. मात्र पुढचा हप्ता मिळवण्यासाठी लाभार्थ्यांनी आपले ई–केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे. सरकारने या प्रक्रियेची अंतिम तारीख १८ नोव्हेंबर निश्चित केली आहे. परंतु आतापर्यंत केवळ ८० लाख महिलांनीच केवायसी पूर्ण केली, अशी माहिती मिळाली आहे. अजून लाखो महिला या प्रक्रियेत सहभागी झालेल्या नाहीत, त्यामुळे अनेकांकडून केवायसीची मुदतवाढ मागणी होत आहे.

नोव्हेंबर महिन्याचा हप्ता कधी मिळणार याबाबत उत्सुकता

दुसरीकडे, महिलांमध्ये आता नोव्हेंबर महिन्याचा हप्ता कधी मिळणार याबाबतही उत्सुकता आहे. ऑक्टोबर महिन्याचा हप्ता काही तांत्रिक कारणांमुळे उशिरा जमा झाला होता. त्यामुळे अनेकांना नोव्हेंबरचा हप्ता वेळेवर मिळेल का, याबाबत शंका व्यक्त होत आहे. शासनाच्या सूत्रांनुसार, केवायसी प्रक्रिया पूर्ण झालेल्या महिलांनाच पुढचा हप्ता मिळणार आहे. त्यामुळे उर्वरित लाभार्थ्यांना शक्य तितक्या लवकर केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

परिस्थिती पाहून मुदतवाढ देण्याचा निर्णय

एकूणच, लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातील लाखो महिलांना दिलासा देणारा हा टप्पा असला तरी, केवायसी प्रक्रिया पूर्ण न झाल्याने काही लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, सरकार परिस्थिती पाहून मुदतवाढ देण्याचा निर्णय घेऊ शकते, अशी शक्यता आदिती तटकरे यांच्या विधानातून व्यक्त झाली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत या संदर्भात सरकारकडून महत्त्वाचा निर्णय जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी या संदर्भात महत्त्वाचे विधान केले आहे. त्यांनी सांगितले की, आतापर्यंत सुमारे ८० लाख महिलांचे ई–केवायसी पूर्ण झाले आहे. १८ नोव्हेंबरपर्यंत आणखी लाभार्थ्यांचे केवायसी पूर्ण होतील, अशी अपेक्षा आहे. मात्र जर सर्वांनी प्रक्रियेत भाग घेतला नाही, तर परिस्थिती पाहून सरकार योग्य निर्णय घेईल. त्यांच्या या वक्तव्यानंतर केवायसीची मुदतवाढ होण्याची शक्यता अधिक बळावली आहे. महिलांच्या सुविधेसाठी सरकारने केवायसी प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू केली आहे. लाभार्थ्यांना https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन आवश्यक माहिती भरून केवायसी करावी लागते. मात्र, अनेक महिलांना या प्रक्रियेत अडचणी येत आहेत. काहीवेळा वेबसाइट लोड होत नाही, तर काही वेळा ओटीपी मिळत नाही. त्यामुळे महिलांकडून तक्रारी वाढल्या होत्या. या समस्या लक्षात घेऊन सरकारने आता प्रक्रिया अधिक सुलभ केली आहे. आधी दररोज ५ लाख महिला केवायसी करू शकत होत्या, पण आता ती क्षमता वाढवून १० लाख महिलांपर्यंत करण्यात आली आहे.

ओमकेश पाटील जाधव यांची क्लास–वन अधिकारी म्हणून निवड; सत्काराने गौरव

दैनिक वादळ वार्ता
नांदेड । हानुमंत चंदनकर

नांदेड जिल्ह्यातील कौठा (धानोरा) येथील ओमकेश उत्तमराव पाटील जाधव यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (चझडउ) राज्यसेवा परीक्षा २०२४ मध्ये राज्यात ५४ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले असून त्यांची क्लास–वन अधिकारी म्हणून निवड झाली आहे.

या अभूतपूर्व यशाबद्दल खासदार रवींद्र पाटील चव्हाण व सामाजिक कार्यकर्ते अक्षय पाटील चव्हाण यांच्या वतीने ओमकेश पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी उपस्थितांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

ओमकेश पाटील यांनी जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळवले. दिवस–रात्र अखंड अभ्यास करून त्यांनी यशाचे सर्वोच्च शिखर गाठले आहे. त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून नांदेड जिल्ह्यात अभिमानाची भावना व्यक्त केली जात आहे.या प्रसंगी विविध मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थी दिवस हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रविष्ट दिवस समाजाला प्रेरणादायी–आनंद भैय्या गायकवाड

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दिनांक ६ नोव्हेंबर २०२५ रोजी विद्यार्थी – दिवस अर्थात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रविष्ठ (प्रवेश) दिवस व्याख्यान कार्यक्रमाने साजरा करण्यात आला.सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले. त्यानंतर व्याख्यान कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी आनंद भैय्या गायकवाड व दादासाहेब गायकवाड यांची व्याख्याने झाली.विद्यार्थी – दिवस हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रविष्ट (प्रवेश) दिवस समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन व्याख्यान देताना आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण घेणारे डॉ. बाबासाहेब देशाचे

संविधान लिहितात आणि त्याच संविधानावर देश चालतो हि प्रेरणादायी घटना असल्याचे प्रतिपादन आनंद भैय्या गायकवाड यांनी केले. दादासाहेब गायकवाड यांनी आपल्या व्याख्यानात शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच रामराजे गायकवाड हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. सुत्रसंचालन एस.के.वैरागे यांनी केले तर आभार प्रदर्शन बाळासाहेब गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमाला वाचक, हितचिंतक,जेष्ठ नागरीक, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

चाईल्ड प्रायमरी स्कूल ची कृषी प्रदर्शनाची शैक्षणिक सहल,विद्यार्थ्यां साठी ज्ञान आणि आनंदाचा संगम

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

चाईल्ड प्रायमरी स्कूल तर्फे विद्यार्थ्यांसाठी एक आगळीवेगळी शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली.या सहलीत विद्यार्थ्यांना शहरात भरविण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनाला नेण्यात आले.याप्रदर्शनात विद्यार्थ्यांनी आधुनिक शेतीतील यांत्रिकीकरण, नवनवीन शेती तंत्रज्ञान, आधुनिक सिंचन पद्धती, सेंद्रिय शेतीचे महत्त्व तसेच कृषी क्षेत्रात होत असलेल्या प्रगत बदलां विषयी प्रत्यक्ष माहिती मिळवली.प्रदर्शनात ट्रॅक्टर,हार्वेस्टर,ड्रोन तंत्रज्ञान,बियाणे प्रक्रिया यंत्रणा तसेच शेतकऱ्यां साठी उपलब्ध असलेली अत्याधुनिक साधने पाहून विद्यार्थ्यांनी डोळे विस्फारले त्यांनी शेतमालाच्या विविध उत्पादनांविषयी अनेक प्रश्न विचारले व मार्गदर्शकांकडून समाधानकारक उत्तरे मिळवली.शेती ही आपल्या देशाची खरी ताकद आहे,हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून जाणवले.या सहलीमुळे त्यांच्या मनात कृषीविषयी आदरभाव निर्माण झाला तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा शेतीशी असलेला जवळचा संबंध त्यांनी समजून घेतला.विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह झळकत होता.नवीन ज्ञानाचा खजिना मिळाल्याची भावना त्यांच्या प्रत्येक नजरेत दिसत होती.शाळेचे मुख्याध्यापक म्हणाले की,अशा शैक्षणिक सहली विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धी सोबतच त्यांचा दृष्टिकोन विस्तृत करतात.शिक्षण केवळ वर्गात नाही,तर प्रत्यक्ष अनुभवातून अधिक प्रभावीपणे घडते.एकूणच,ही कृषी प्रदर्शनाची शैक्षणिकसहल विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आणि आनंददायी ठरली.सहलीच्या शेवटी विद्यार्थ्यांना स्वादिष्ट खाऊ देऊन आनंदात दिवसाचा समारोप करण्यात आला. विध्यार्थ्यांना मार्गदर्शन डॉ.हनुमंत सौदागर सर यांनी केले.यावेळी सर्व स्टाफ उपस्थित होता.

बीडमध्ये शिवसेनेच्या उमेदवार निवडीसाठी आज मुलाखती!

सर्व इच्छुक उमेदवारांनी आपल्या कार्य अहवालसह उपस्थित राहावे–अनिलदादा जगताप

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

आगामी नगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने उमेदवार निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे. या अनुषंगाने पक्षाकडून उमेदवारीसाठी अर्ज दाखल केलेल्या इच्छुकांची मुलाखत येत्या सोमवारी दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. या मुलाखतींचे आयोजन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळ्याजवळील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे करण्यात आले आहे. सर्व इच्छुकांनी आपल्या कार्य अहवालासह सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले आहे.

मुलाखतीदरम्यान बीड शहरातील शिवसेनेचे मुख्य पदाधिकारी व निरीक्षक उपस्थित राहणार असून, प्रत्येक प्रभागातून अभ्यासू, नेतृत्वसक्षम, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख चेहरा पुढे आणण्यावर भर दिला जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडणार असल्याचे अनिलदादा जगताप यांनी स्पष्ट केले. नगरपालिका निवडणुका या केवळ राजकीय स्पर्धा नसून शहराच्या भविष्यास आकार देणाऱ्या प्रक्रिया आहेत. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, वाहतूक, बाजारव्यवस्था व नागरिक कल्याण यांसारख्या जीवनावश्यक कामांची जबाबदारी नगरपालिका व्यवस्थेवर असते. त्यामुळे सक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे अत्यावश्यक असल्याचेही जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी नमूद केले. शिवसेनेच्या उमेदवार निवड प्रक्रियेत इच्छुकांनी वेळेत उपस्थित राहून सहभाग घ्यावा, असे आवाहनही जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले आहे.

नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई व्यापाऱ्यांना हप्ता मागणाऱ्या आरोपीची धिंड काढत दाखल केला गुन्हा

दैनिक वादळ वार्ता
नांदेड । प्रतिनिधी

व्यापाऱ्यांकडून हप्ता वसुलीची धमकी देणाऱ्या आरोपीविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलिसांनी जबरदस्त कारवाई करत गावातच आरोपीची धिंड काढली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून पोलिसांच्या या कारवाईचं सर्वत्र कौतुक होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने स्थानिक व्यापाऱ्यांना धमकी देत पैसे मागितले होते. या घटनेची माहिती मिळताच नांदेड ग्रामीण पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत हप्ता मागणीचे पुरावे मिळाल्यानंतर पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी समाजात संदेश जावा या हेतूने आरोपीची गावातून धिंड काढली. या कारवाईदरम्यान मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या या कृतीचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

पोलिसांकडून आवाहनः कोणालाही अशा प्रकारे धमक्या किंवा वसुलीचे प्रकार सहन करू नका, त्वरित पोलिसांना माहिती द्या.ह्या घटनेमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीला चाप बसण्यास मदत होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

संपादकीय

‘स्थानिक स्वराज्य’साठी सर्व पक्षांच्या नेत्यांकडून चाचपणी

देशाचा विकास झपाट्याने करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी मराठवाड्याने यापूर्वी ताकद लावली. तेच चित्र पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दिसणार आहे. भाजपने ’छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, धाराशिव, लातूर तसेच नांदेड या आठ जिल्ह्यांत विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मराठवाड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भरपूर कामे केली आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील जनता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपच्या पाठीशी राहणार, असे चित्र आज दिसून येत आहे.

‘विकास हेच ध्येय’ या धर्तीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्यात विविध विकासकामांना भरभरून निधी दिला. त्याचा फायदा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नक्कीच दिसून येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर मराठवाड्यात सर्व पक्षांच्या नेत्यांकडून चाचपणी केली जात आहे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना तसेच काँग्रेस पक्षाच्यावतीने मराठवाड्यात विविध नेत्यांनी वेगवेगळ्या विकासकामांच्या उद्घाटन सोहळ्याच्या नावावरून उपस्थिती लावली. जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगर परिषद व महापालिका निवडणुकीत आपल्या पक्षाच्या उमेदवारांना यश मिळावे, यासाठी सर्वपक्षीय नेते जास्तीत जास्त निधी देऊन विकासकामांचा धुराळा उडवीत आहेत. देशाचा विकास झपाट्याने करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी मराठवाड्याने यापूर्वी ताकद लावली. तेच चित्र पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दिसणार आहे. मराठवाड्यातील जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याला विसरणार नाही, असे चित्र दिसून येत आहे.छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, धाराशिव, लातूर तसेच नांदेड या आठ जिल्ह्यांत भाजपने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मराठवाड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भरपूर कामे केली. त्यामुळे मराठवाड्यातील जनता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपच्या पाठीशी राहणार, असे चित्र आजघडीला दिसून येत आहे. सर्वच पक्षांच्या सभा मराठवाड्यात अलीकडच्या काळात पार पडल्या. त्यावेळी भाजप वगळता अन्य कुठल्याही पक्षाच्या सभांना जास्त गर्दी नव्हती. मराठवाडा हा एकेकाळी शिवसेनेचा गड होता. बाळासाहेब ठाकरे यांना मानणारा मोठा वर्ग मराठवाड्यात होता. त्या पाठोपाठ काँग्रेसने देखील मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत एकेकाळी चांगलेच वर्चस्व गाजविले; परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०१४ मध्ये पंतप्रधान झाल्यानंतर आजपर्यंत भाजपने केलेली विकासाची घोडदौड संपूर्ण देशभरात चर्चेचा विषय ठरली. त्यानंतर भाजपकडे मतदार झपाट्याने वळू लागला. त्याचप्रमाणे मराठवाड्यात देखील अनेकांनी नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी उभे राहून ‘शतप्रतिशत भाजप’ हाच नारा विकासाच्या दृष्टिकोनातून स्वीकारला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने मराठवाड्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी देण्यात आला. त्या निधीमुळे मराठवाड्याचा कायापालट झाला व अनेक विकासाची कामे अद्यापही सुरू आहेत. मराठवाड्यात पाण्याची समस्या लक्षात घेऊन वॉटर ग्रीड प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली.यापूर्वी तत्कालिन उबाठा गटाचे मुख्यमंत्री यांच्या कार्यकाळात मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प रद्द करण्यात आला होता. मराठवाड्यातील जनतेच्या तोंडचे पाणी पळविण्याचे पाप उबाठाने केल्यामुळे त्यांच्याविषयी मराठवाड्यात चीड निर्माण झाली. भाजपने मात्र कुठलाही दुजाभाव न करता संपूर्ण मराठवाड्यात विकासाला हातभार लावला. त्यामुळेच येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मराठवाड्यातील मतदार नगर परिषद, महापालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपला भरीव प्रमाणात मतदान करण्याच्या मनस्थितीत आहेत. मराठवाड्याच्या सीमेवर तेलंगणा हे राज्य आहे. या ठिकाणी एमआयएमचे खासदार अकबरुद्दीन ओवेसी हे पुन्हा एकदा महापालिका निवडणुकीत नांदेडमध्ये एमआयएमच्या उमेदवारांना पुढे करण्याच्या दृष्टिकोनातून दौरे करत आहेत. यापूर्वी एमआयएम पक्षाच्या १३ नगरसेवकांना निवडून आणण्यात नांदेड महापालिकेत ओवेसी यांना यश आले होते. त्याचबरोबर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील नांदेड जिल्ह्यात विशेष लक्ष केंद्रित केले आहे. नांदेडसह लातूर, जालना जिल्ह्यात महापालिका ताब्यात घेण्यासाठी काँग्रेस कामाला लागली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी देखील मराठवाड्यात दौरे वाढविले आहेत. मराठवाड्यातील जास्तीत जास्त जिल्हा परिषदा ताब्यात घेण्यासाठी अजित पवार यांनी आखणी सुरू केली आहे. उबाठाचे नेते देखील शेतकऱ्यांविषयी कळवळा दाखवत मराठवाड्यात फिरत आहेत. मराठवाड्यात शेतकऱ्यांचे झालेले अतिवृष्टीतील नुकसान लक्षात घेऊन भाजपने भरीव मदत केलेली आहे. त्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी खाल्लेल्या मिठाला जागणारे आहेत. भाजप व्यतिरिक्त अन्य कोणत्याही पक्षाचे नेते शेतकऱ्यांची मते वळवू शकणार नाहीत, असे चित्र सध्या दिसून येत आहे. गेल्या अडीच-तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. त्यादरम्यान भाजप वगळता अन्य कुठल्याही पक्षाच्या नेत्यांनी नागरिकांना जवळ केलेले नाही. लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी भाजपने नेहमीच पुढाकार घेतला. त्याचा फायदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपलाच होणार आहे. येणाऱ्या २० दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील चित्र स्पष्ट होईल. एकंदरीत मराठवाड्यात भाजपला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ‘अच्छे दिन’ येतील, असा तर्क राजकीय विश्लेषक लावत आहेत.

पत्रकार राजरतन डोंगरे यांना अर्वाच्य भाषेत बाचाबाची करणाऱ्या

पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचे निलंबन करून बदली करा

पत्रकार सुरक्षा समितीसह विविध संघटनेच्या वतीने पोलीस उपभागीय अधिकाऱ्यांना निवेदन!

दैनिक वादळ वार्ता
माजलगाव । दर्शन डोंगरे

पत्रकार राजरतन डोंगरे यांना अर्वाच्य भाषेत बाचाबाची करणाऱ्या पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचे निलंबन करून बदली करा पत्रकार सुरक्षा समिती सह विविध संघटनेच्या वतीने पोलीस उपभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी देण्यात आले आहे आणि मा.मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब महाराष्ट्र राज्य मुंबई मुख्यमंत्री कार्यालय (मंत्रालय विभाग मुंबई) यांना ई-मेल द्वारे निवेदन पाठविण्यात आले आहे सविस्तर वृत्त असे की बीड जिल्ह्यातील माजलगाव शहर पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी पत्रकार राजरतन डोंगरे यांना अर्वाच्य भाषेत अपमानित करण्यात आले व पोलीस स्टेशनच्या कॅबिनच्या बाहेर काढण्यात आले यामुळे त्यावेळेच्या घटनाक्रमाचा सीसी फुटेज व व्हिडिओ हे तपासून याची सखोल चौकशी करुन लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या पत्रकाराला ज्या पद्धतीने अधिकारी वागणूक देत आहे अशा अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात यावे व तात्काळ महाराष्ट्र च्या सिमा रेषेवर असलेल्या पोलीस ठाण्यात बदली करण्यात यावी. माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी पत्रकार राजरतन डोंगरे हे मुलाखत घेण्यासाठी शहर पोलीस स्टेशनला त्यांच्या ऑफिस मध्ये त्यांच्याशी विचारणा केली असता माजलगाव तालुक्यातील अवैध धंदे, मटका, गुटखा, वाळू तस्करी, खुलेआम दारूची विक्री, घरफोडी व व्यापार्यांच्या दुकान फोड़ीसह इतर अवैध धंदे फोपावले असून या संदर्भात त्याची विचारणा करण्यासाठी गेलेले पत्रकार राजरतन डोंगरे (लोक मंच मराठी) (जिल्हा प्रतिनिधी) हे या टीव्ही चॅनेलला मुलाखत घेण्यासाठी विचारणा केली असता त्यांनी यावेळी मुलाखत न देता (पोलीस निरीक्षक) राहुल सूर्यतळ यांनी आपल्या वैयक्तिक जीवाशी घेत तू माझ्या कॅबिनला कशामुळे आला व कॅमेरा घेऊन का येतोस असे बोलत हे लावून घेतले आणि राजरतन डोंगरे यांच्याशी आरेरावी करत अर्वाच्य भाषेत त्यांचा अपमान केला हा सर्व घटनाक्रम माजलगाव शहर पोलिस ऑफिसच्या सीसीटीव्ही मध्ये कैद आहे त्याची पडताळणी करून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करावी. राजरतन डोंगरे यांना धमकी (३५३) जुन्या कायद्यानुसार दिली व भारतीय न्याय संहिता बि एस एन एल नविन कायद्या नुसार सुधारित १३२ गुन्हा दाखल करण्यात येईल याची धमकी दिली व तू कदापीही कुठल्याही अधिकाऱ्यांना अशा प्रकारचे प्रश्न भविष्यात विचारले नाही पाहिजे ! त्यामुळे तुला ही एक तंबी माझ्यातर्फे देईल अशी धमकी दिली यामुळे राजरतन डोंगरे यांचे मनोबलाचे खच्चीकरण झाले आहे व ते द्विवेदी अवस्थेमध्ये आहेत त्यामुळे पत्रकार सुरक्षा समिती व विविध संघटनेच्या पदाधिकारी च्या वतीने निवेदन सर्व पत्रकार यांच्यावतीने देण्यात येत आहे. या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करून तात्काळ योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी बीड जिल्ह्यातील व माजलगाव तालुक्यातील सर्व पत्रकारांच्या वतीने मा.मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदन ई-मेल द्वारे पाठविण्यात आले आहे आणि महाराष्ट्र विधान परिषद विरुद्ध पक्षनेते अंबादास दानवे साहेब, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार साहेब तथा पालकमंत्री बीड जिल्हा, आमदार प्रकाश दादा सोळंके साहेब, पोलीस आयुक्त साहेब कार्यालय संभाजीनगर, बीड जिल्हा अधिकारी साहेब,पोलीस अधीक्षक साहेब बीड, यांना निवेदन ईमेलद्वारे पाठविण्यात आले आहे आणि पोलीस उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना कार्यालयात जाऊन निवेदन दिनांक ९ /११/२०२५ रोजी देण्यात आले आहे

शिळे होताच हे ५ पदार्थ होतात रुचकर आणि आरोग्यदायी, आजारांना पळवून लावतात

दैनिक वादळ वार्ता

जेवण नेहमीच तेवढेच बनवावे जेवढ्याची गरज आहे. आयुर्वेद असो की मॉर्डन सायन्स दोन्हींच्या मते जेवण नेहमी ताजे आणि लागलीच बनवून खायला हवे. अन्न फ्रिजमध्ये ठेवल्याने त्याची चव आणि पोषक तत्वे कमी होतात असेही म्हटले जाते. परंतू काही पदार्थ असे असतात जे शिळे झाल्यानंतर अधिक रुचकर होतात आणि त्यातील पोषक गुणही वाढतात. चला तर असे पदार्थ पाहूयात

शिळ्या चपात्या खाणे

अनेक घरात रात्री उरलेल्या चपात्या सकाळी चहा सोबत खाल्ल्या जातात. जर रात्री चपात्या शिल्लक राहिल्या असतील तर त्यांना गरम करुन खाणे फायद्याचे ठरु शकते. वास्तविक शिळ्या चपात्यात फर्मेंटेशनची प्रक्रिया सुरु झालेली असते. ज्यामुळे गट हेल्थसाठी ती फायदेशीर असते. त्यामुळे एकूणच पचनास फायदा होतो. डायबिटीज मॅनेजमेंटसाठी देखील ही फायद्याची म्हटले जाते.

पोटासाठी चांगला शिळा भात

रात्रीचा उरलेला शिळा भात सकाळी आणखी पौष्टीक होतो. भारताच्या अनेक राज्यात शिळा भाताला फोडणी देऊन एक डिश म्हणून खाल्ले

जाते. शिजलेल्या भाताला रात्रभर भिजवले जाते. सकाळी यात कांदा, मीठ, मिरची टाकून खाल्ले जाते. यास पन्ता भात आणि शिळा भात म्हणून खाल्ले जाते. हा फर्मेंटेड राईस पोटासाठी चांगला असतो. यात आयर्न, सोडियम, पोटॅशियम आणि कॅल्शियम सारखे पोषक तत्वं देखील भरपूर असतात.

शिळी खीर टेस्टी आणि हेल्दी

भारतीय घरात जेवणात काही गोडधोड खाल्ले जाते. गोड खाण्यासाठी अनेकदा तांदळाची खीर बनवली जाते, हीचा स्वाद एकदम भारी असतो. परंतू तुम्ही रात्री उरलेली शिळी खीर खाता का ? ती आणखीनच टेस्टी लागते आणि आरोग्यासाठी देखील फायद्याची असते. रात्री उरलेली खीर फ्रिज थंड करण्यास ठेवावी आणि सकाळी दुसऱ्या दिवशीचा तिचा स्वाद घ्यावा. थंडगार खीर रबडी सारखी स्वादिष्ट होते. तुमच्या पोटाच्या आरोग्यासाठी देखील चांगली असते.

शिळे दही देखील फायद्याचे

एक वा दोन दिवस जमण्यासाठी ठेवलेले दही देखील शिळे झाल्यावर फायदेमंद असते. त्यात फर्मेंटेशनची प्रक्रीया वेगाने होते. आणि गुड बॅक्टेरियाची ग्रोथ वाढू लागते. या प्रकारचे दही पचनासाठी चांगले असते. हे शिळे दही पचन सुधारण्यासोबतच इम्युनिटी पॉवर देखील वाढवते. अशा दह्यातील विटामिन्सचे प्रमाण वाढते. ज्या लोकांना दूध वा दही पचत नाही त्यांच्यासाठी शिळे दही उत्तम असते.

शिळा राजमा भात

केवळ भातच नाही तर राजमा चावल देखील शिळा झाल्यानंतर जास्त चविष्ट आणि आरोग्यदायी असतो. रात्रभर राजमा ठेवला जातो, तेव्हा त्यातील मसाले आणि बिन्स चांगले मिक्स होतात . त्यामुळे चवही चांगली होते. यातील कार्ब्स ब्रेकडाऊन होऊ लागतात. त्यामुळे पचन सहज होते. राजमात प्रोटीन, फायबर, आयर्न आणि पोटॅशियम सारखे अनेक पोषक तत्वं असतात. ज्यांना एब्जॉर्ब करणे आणखीन सोपे होते.

लसणाचे झणझणीत लोणचे कसे बनवायचे?

दैनिक वादळ वार्ता

लसूण हा आपल्या आहाराचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि त्याशिवाय अन्नाची चव बऱ्याचदा अपूर्ण वाटते. विविध पदार्थांची चव वाढवण्याबरोबरच आरोग्यालाही फायदा होतो. आपल्या आहारात त्याचा समावेश करणे खूप महत्वाचे आहे. जर तुम्हालाही लसूण आपल्या आहाराचा एक भाग बनवायचा असेल तर तुम्ही त्याचे लोणचे बनवू शकता.हिवाळा सुरू झाला असून पुन्हा एकदा व्हायरल इन्फेक्शनचा धोका वाढेल. कोणत्याही प्रकारचा आजार आणि संसर्गापासून वाचण्यासाठी रोग प्रतिकारशक्ती मजबूत करणे महत्वाचे आहे आणि लसूण यात तुमची मदत करू शकते.लसूण आपल्याला सामान्य सर्दीपासून वाचविण्यास तसेच रक्तदाब आणि कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यास मदत करते. अशा परिस्थितीत, आपण आपल्या आहारात अनेक प्रकारे याचा समावेश करू शकता, परंतु लसूण लोणचे हा आहाराचा एक भाग बनवण्याचा एक चांगला मार्ग आहे. लसूण लोणचे खाण्यास केवळ स्वादिष्टच नाही, तर ते दररोज मर्यादित प्रमाणात खाल्ल्याने बरेच फायदे

देखील प्रदान करते. घरी स्वादिष्ट आणि निरोगी लसूण लोणचे कसे बनवायचे ते जाणून घेऊया-

लसणाच्या लोणच्याची रेसिपी साहित्य

सोललेला लसूण - २०० ग्रॅम, मोहरी - २ टेबलस्पून, हळद - १ टीस्पून, तिखट (लाल मिरची पूड) - ३ टेबलस्पून, मीठ - चवीनुसार, लिंबाचा रस किंवा व्हिनेगर - २ टेबलस्पून, तेल (तीळाचे किंवा मोहरीचे) - १५० ते २०० मि.ली., मेथी दाणे - १ टीस्पून, हिंग - १/४ टीस्पून

कृती

- लसूण सोलणे: लसूण स्वच्छ सोलून घ्या आणि कोरडा पुसून ठेवा.
- मेथी आणि मोहरी भाजणे: दोन्ही दाणे थोडे भाजून घ्या आणि बारीक पूड करा.
- तेल गरम करणे: कढईत तेल गरम करा. तेल चांगले गरम झाल्यावर थोडे थंड होऊ द्या.
- मसाला तयार करणे: थंड झालेल्या तेलात हळद, तिखट, मीठ, मेथी-मोहरीची पूड, आणि हिंग मिसळा.
- लसूण घालणे: या मसाल्यात लसूण घाला आणि नीट मिक्स करा.
- लिंबाचा रस किंवा व्हिनेगर: आता लिंबाचा रस (किंवा व्हिनेगर) घालून पुन्हा मिसळा.
- भरणे: हे लोणचे कोरड्या, स्वच्छ बरणीत भरून ठेवा.
- साठवणे: २ दिवस रोज एकदा हलवा, जेणेकरून मसाला सर्व लसूणावर बसेल.

आता तुमचे लसणाचे लोणचे हे ३-४ दिवसांनी लोणचे तयार होईल. संसर्गापासून वाचण्यासाठी रोग प्रतिकारशक्ती मजबूत करणे महत्वाचे आहे आणि लसूण यात तुमची मदत करू शकते.

काही खास टिप्स

तेल आणि बरणी पूर्णपणे कोरडी असावी.

थंड ठिकाणी ठेवा, आणि रेफ्रिजरेट केल्यास जास्त दिवस टिकते.

सुका पराठा, भाकरी किंवा डाळ-भातासोबत अप्रतिम लागते.

जगातील पहिले शाकाहारी शहर

दैनिक वादळ वार्ता । **गुजरात । प्रतिनिधी**

जगात मासांहारी खाणाऱ्यापेक्षा आता शाकाहारी लोकांची संख्या वाढत चालली आहे. शाकाहारी जेवण शरीरास अधिक मानवते. कोरोना काळापासून लोकांचा कल शाकाहाराकडे चालला आहे. आरोग्याच्या दृष्टीने मासांहारा पेक्षा शाकाहार केव्हाही चांगलाच असल्याचे म्हटले जाते. अशात आता भारतातील एक शहर जगातले पहिले शाकाहारी शहर म्हणून घोषीत झाले आहे. कोणते हे शहर आहे हे पाहूयातगुजरात येथील पालीताना या शहरात नॉन व्हेज वर संपूर्णपणे बंदी घातली आहे. भावनगर जिल्ह्यातील पालीताना येथे आता केवळ शुद्ध शाकाहारी जेवण मिळणार आहे. पालीताना जगातले पहिले शाकाहारी शहर बनले आहे. येथे आता केवळ शाकाहारी पदार्थ मिळतील असे म्हटले जात आहे.हा निर्णय जैन मुनींनी केलेल्या विरोधानंतर घेण्यात आला आहे. नॉन व्हेज भोजनावर संपूर्ण प्रतिबंध केल्यामुळे हे शहर जगभरात चर्चेत आले आहे.पालिताना शहर जैन धर्मियांचे एक तिर्थस्थान आहे. देश आणि जगभरातील जैन धर्माच्या लोकांसाठी हे एक महत्वाचे पवित्र स्थळ आहे. या निर्णयामागे येथील धार्मिक श्रद्धा महत्वाची मानली जात आहे.

पालीताना गुजरातच्या अहमदाबाद पासून ३८१ किमीवर आहे. येथे रस्ते मार्गे येण्यासाठी किमान सात तास लागतात. जैन धर्माचे तिर्थस्थान असलेल्या या शहरात नॉन व्हेजवर बंदी घालण्यासाठी तर २०१४ पासून सुमारे २०० मुनींनी २५० तासांचे उपोषण केले होते. यात

कत्तलखान्यांना बंद करण्याची मागणी होती. जैन धर्मियांच्या श्रद्धेचा सन्मान करण्यासाठी सरकारने मांस,अंडी विक्री आणि पशुवधावर प्रतिबंध घातला. एवढेच नाही तर नियम तोडल्यावर दंडाची तरतूद केली. सरकारचा हा निर्णय जैन धर्मियांचा मोठा विजय मानला जातो.नॉनव्हेज बंदीमुळे पालीताना येथे अनेक शाकाहारी रेस्टॉरंट उघडण्यात आले आहेत. येथे विविध शाकाहारी पदार्थांना वाढले जाते. भावनगरच्या पालीताना शहरावर भाजपाचे राज्य आहे. २००२ मध्ये पालीताना विधानसभा क्षेत्र बनले. येथे २०१२ चा अपवाद वगळता भाजपाचा विजय झाला आहे. या जागेवरुन निवडून आलेले आमदार केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया झाले आहेत. ते २००२ पासून येथे विजयी होत आले आहेत. पालिताना येथील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे येथील जैन धर्माचे सर्वात पवित्र तीर्थक्षेत्र मानल्या जाणाऱ्या शत्रुंजय पर्वतावर असलेले ९०० हून अधिक संगमरवरी मंदिरांचा जगातील सर्वात मोठे आणि अनोखा परिसर होय.

अहिल्यानगर (ढवळपुरी) येथे ५१२ व्या दिव्य धर्म यज्ञ दिनानिमित्त भव्य महासमागम; 'सेवा' आणि 'भक्ती'चा अनोखा संगम!

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी

नमस्कार! महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील ढवळपुरी येथे दिनांक ४, ५, ६ नोव्हेंबर रोजी झालेल्या ५१२ व्या दिव्य धर्म यज्ञ दिनाच्या निमित्ताने तीन दिवसीय महासमागम कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. नव्याने निर्माण होत असलेल्या आश्रमात लाखो भाविक आणि जगत समुदायासाठी कुठल्याही कमतरतेशिवाय भंडाऱ्याचे आणि व्यवस्थेचे अत्यंत भव्य आयोजन करण्यात आले, जे जगद्गुरू तत्वदर्शी संत रामपाल जी महाराज यांच्या आशीर्वादाचा व त्यांच्या शिष्यांच्या निस्वार्थ सेवेचा परिणाम असल्याचे स्पष्ट झाले.

या धर्मयज्ञ सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो भाविक दाखल झाले होते. विशेष म्हणजे, कार्यक्रमाच्या अनेक दिवस आधीपासूनच सेवेदार दाखल झाले होते.

नंदुरबार जिल्ह्यातील सुमारे २३० सेवेदारांनी या सेवेत आपले मोठे योगदान दिले. 'मिळेल ते काम करणे व कुठल्याही कामास नकार न देणे' या भूमिकेतून त्यांनी आपली क्षमता सिद्ध केली. त्यांच्या या निस्वार्थ सेवेची पुनरावृत्ती पाहून, यापूर्वी संत रामपाल जी महाराज यांनी देखील नंदुरबारच्या सेवेची दखल घेतल्याची आठवण ताजी झाली.

कबीर साहेब म्हणतात:
कबीर, सेवा करणी सार है, और न दूजा काम।
मानुष से तो देवता, हुए करत निहकाम।।
(अर्थ: कबीर साहेब म्हणतात की निस्वार्थ सेवा करणे हेच सर्वात महत्त्वाचे कार्य आहे, दुसरे काहीही नाही. निस्वार्थ सेवा केल्यामुळे मनुष्य देखील देवत्व प्राप्त करू शकतो.)

राज्यभरातून एवढ्या मोठ्या संख्येने भाविक येऊनही भंडाऱ्याची किंवा सेवेची कोणतीही कमतरता जाणवली नाही. यामुळेच संत वचन पलटे नाही, पलट जाये ब्रम्हांड या श्रद्धेवर भाविकांचा विश्वास अधिक दृढ झाला.

कबीर साहेब म्हणतात:
जहाँ दया तहाँ धर्म है, जहाँ लोभ वहाँ पाप।
जहाँ क्रोध तहाँ काल है, जहाँ क्षमा तहाँ आप (परमात्मा)।।
(याचा अर्थ असा की, जिथे दया आहे, तिथे धर्म आहे, जिथे लोभ आहे तिथे पाप आहे. या महासमागमात दिसून आलेली निष्काम सेवा आणि भंडारा हेच भक्तांच्या हृदयात असलेली दया आणि परोपकाराचा धर्म दर्शवते.)

कार्यक्रमात आलेल्या प्रत्येक भक्ताचे स्वागत 'सत साहेब' म्हणून केले जात होते आणि प्रत्येक जण दरबारासमोर दंडवत प्रणाम करून भंडाऱ्यासाठी जात होता. शिस्तीचे आणि भक्तीचे हे विलोभनीय दृश्य पाहून उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. भक्तांनी केवळ बाह्य कर्मकांडात न अडकता, मनाला शुद्ध करून भक्ती केल्याचे हे उदाहरण होते.

कबीर साहेब म्हणतात:
माला फेरत जुग भया, फिरा न मन का फेर।
कर का मनका डार दे, मन का मनका फेर।।
(याचा अर्थ असा की, नुसती माळ फिरवून युग लोटले, पण मनाचे परिवर्तन झाले नाही. हातातली माळ बाजूला ठेवून दे, आणि मनाच्या माळेचे दाणे फिरव (म्हणजेच मन शुद्ध कर व सद्गुरूंच्या वचनावर श्रद्धा ठेव).)या तीन दिवसांच्या कार्यक्रमासाठी ३६ जिल्ह्यांचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते, ज्यामुळे आलेल्या भक्तगणांना कोणतीही अडचण जाणवली नाही आणि उत्कृष्ट सेवा देता आली.

संत रामपाल जी महाराज यांच्या कृपेने आणि शिष्यांच्या निस्वार्थ सेवा सुमिरण दान वृत्तीमुळे हा महासमागम अत्यंत यशस्वी आणि प्रेरणादायक ठरला.

आमलीबारी घाटात शालेय बसला भीषण अपघात: ५२ विद्यार्थ्यांपैकी २२ सुरक्षित, जखमींवर तातडीने उपचार!

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी

अक्कलकुवा तालुक्यातील अतिदुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या नशिबी आज काळरात्र ठरली. मोलगी ते अक्कलकुवा दरम्यान आमलीबारी गावाजवळच्या धोकादायक घाटात विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी खाजगी स्कूल बस (क्र. एम एच १५ ए के १४५९) खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दोन शालेय विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला असून, १८ विद्यार्थी जखमी झाले आहेत. जखमींपैकी दोन विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली आहे.

सातपुडा परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांना चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे येथील अनुदानित आदिवासी आश्रम शाळेत घेऊन जाणारी ही बस होती. बसमध्ये विद्यार्थ्यांसह एक शिक्षक आणि एक परिचर असे एकूण ५६ जण असल्याची माहिती मिळाली आहे.

या अपघातात जगदीश बहादूसिंग वळवी (रा. निंबिपाडा) आणि कपिला जहांगिर राऊत (रा. काठी) या दोन विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

अपघातानंतर तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले. जखमी विद्यार्थ्यांना अक्कलकुवा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक डॉ. गणेश पवार आणि कर्मचाऱ्यांनी तात्काळ योग्य उपचार सुरू केले. उपचारांनंतर यापैकी १८ जखमी विद्यार्थ्यांना अधिक उपचारांसाठी (संदर्भ सेवेसाठी) तातडीने नंदुरबार येथील जिल्हा रुग्णालयात रवाना करण्यात आले आहे. डॉ. पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, या १८ जखमींपैकी दोन विद्यार्थ्यांची स्थिती गंभीर आहे.

जयश्री केशव वसावे, अत्तर सिंग मुंग्या वसावे, रीना अत्तेसिंग वसावे, अर्जून दिल्या वसावे, अनमोल राया वसावे, ऊर्मिला दिनेश तडवी, शिल्पा मंगलसिंग वळवी, आर्या सुरसिंग वळवी, अजित सागर वळवी, संदिप अभिजीत वळवी, अर्थव विलास तडवी, माया रोत्या वसावे, सोनी दिरवा वळवी, हिना बहादूरसिंग वळवी, रसिला बिलाड्या वसावे, सचिन रामसिंग चौधरी, यशवंता विलास वळवी, करिना सु-या वळवी, संदिप बिज्या तडवी आणि रूषा वळवी.

या घटनेमुळे संपूर्ण आदिवासी पट्ट्यात शोककळा पसरली असून, प्रशासनाने अपघाताच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

भाजपा दौंड पूर्व मंडल सदस्य पदी हिना शेख यांची निवड

दैनिक वादळ वार्ता
दौंड । प्रतिनिधी

भाजपा दौंड पूर्व मंडल सदस्यपदी हिना अझरुद्दीन शेख यांची निवड करण्यात आली असून सौ.हीना अझरुद्दीन शेख या स्वामी-चिंचोली,ता.दौंड ग्रामपंचायतीच्या विद्यमान सदस्या आहेत.त्यांच्या या निवडीमुळे स्वामी चिंचोली परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

आगामी काळात देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी,राष्ट्रीय अध्यक्ष नड्डाजी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, दौंडचे आमदार अँड.राहुल कुल यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची ध्येयधोरणे व कार्य जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच पक्षाला अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहील.असा विश्वास हिना असदुद्दीन शेख यांनी व्यक्त केला.

त्यांना निवडीचे पत्र कांचनताई कुल यांच्या हस्ते देण्यात आले.त्यांच्या या निवडीबद्दल दौंड चे आमदार राहुल कुल यांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

भटक्या कुत्र्यामुळे लहान मुले,ज्येष्ठ नागरिकांत भीती?; शहरातील व ग्रामीण भागात मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली

दैनिक वादळ वार्ता
किनवट । प्रतिनिधी

शहरातील व ग्रामीण भागात भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या त्रासामुळे नागरिकांमध्ये भीतीच्या वातावरण झाल्यामुळे रात्रीच्या महिला लहान मुलांच्या फिरणे झाले बंद. आवारा कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकाकडून होत आहे. आणि ठिकाणी दिवसभर भटक्या कुत्र्यांचे राज्य पाहायला मिळते. रस्त्यावर ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यावर आणि मोटरसायकल वर अनेक ठिकाणी शहर व गावामध्ये असो कुत्रे हल्ले चालू आहे.

रात्रीच्या वेळी त्यांच्या भुंकण्याच्या आवाजाने पूर्ण रात्री नागरिकांना त्रास भोगाव लागते.

शहर व गावातील साफसफाई कचरा व्यवस्थापन तसेच आणि मटन दुकानावर उघड्यावर घेतले जाणाऱ्या अवशेषांमुळे भटक्या कुत्र्याची संख्या वाढत आहे. बकऱ्या, कोंबड्याची, शिकार करण्याची प्रकारे पाहायला मिळाले आहेत.

यावर नियंत्रण ठेण्यासाठी मटन मार्केट परिसर स्वच्छ ठेवणे अन्न मिळवण्याची स्त्रोत बंद करणे महत्त्वाचे आहे. कधी कधी कुत्र्याच्या चाव्यामुळे त्यांच्या विषयापासून एकदाचा मृत्यू होऊ शकतो. नागरिकांमध्ये अशीच भीतीची निर्माण झाले आहे.

मोलगी-धडगाव परिसरातून मजुरांचे लोंढे सुरूच: स्थानिक रोजगार योजना थंडावल्या!

दैनिक वादळ वार्ता
रवींद्र वळवी । मोलगी

सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या मोलगी आणि धडगाव तालुक्यातून ऊस तोडणीसाठी होणारे मजुरांचे मोठ्या प्रमाणावरचे स्थलांतर या वर्षीही सुरूच असून, स्थानिक रोजगार आणि नैसर्गिक आपत्त्यांमुळे मजूर स्थलांतर करण्यास बाध्य झाले आहेत. शासनाच्या उपाययोजना अपुऱ्या पडल्याचे हे चित्र आहे.

दरवर्षी दसऱ्याच्या आसपास स्थलांतराला सुरुवात होते, मात्र यावर्षी अतिवृष्टीमुळे डोंगराळ भागातील पिके मोठ्या प्रमाणात नष्ट झाली आहेत. स्थानिक पातळीवर शेतीत काम उपलब्ध नसल्यामुळे आणि पोटाची खळगी भरण्यासाठी येथील मजूर कुटुंबासह ऊस तोडणीसाठी बाहेर पडले आहेत.

या परिसरातील मजूर महाराष्ट्रात सातारा, सांगली, पंढरपूर, सोलापूर तर गुजरातमध्ये बारडोली, नवसारी यांसारख्या ठिकाणी जात आहेत. संबंधित साखर कारखान्यांचे मुकद्दम यांनी मजुरांना आधीच पैसे वाटलेले आहेत. हे पैसे फेडण्यासाठी मजूर साडेतीन ते चार महिने बाहेरगावी काम करण्यासाठी जात आहेत. होळीच्या वेळी हे मजूर पुन्हा आपल्या गावी परततात. नंदुरबार जिल्हा प्रशासनाकडून 'मूळवाट' यांसारखे उपक्रम व मनरेगाअंतर्गत रोजगार उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरू असले तरी, मजुरांची आर्थिक निकड आणि कर्ज फेडण्याची बांधिलकी या प्रयत्नांवर मात करताना दिसत आहे. स्थलांतर रोखण्यासाठी शासनाने केलेले प्रयत्न निष्फळ ठरले असून, मजुरांचे लोंढे थांबत नसल्याचे चित्र आहे स्थलांतराचा सर्वाधिक गंभीर परिणाम आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांवर होण्याची शक्यता आहे. ऊस तोडणीसाठी बाहेर गेलेले हे मजूर निवडणुकीच्या वेळी मतदारसंघात उपलब्ध नसतील. त्यामुळे मतदानाची टक्केवारी घटणार असून, याचा थेट परिणाम निवडणुकीच्या निकालांवर दिसून येणार आहे.दरम्यान, तळोदा तालुक्याच्या सीमेलगत असलेल्या गुरजराज्यातील दोन साखर खांडसऱ्यामध्ये मात्र बीड, चाळीसगाव या भागातून मजूर येत आहेत या मजुरांना बैलगाड्या देखील पुरविल्या जातात त्यामुळे उसाची वाहतूक आणि तोडणी करणे यातून मजुरांना मोठा आर्थिक फायदा होतो., यावरून स्थानिक आणि बाहेरील भागातील रोजगाराच्या विषमतेवर प्रकाश पडतो.

पोटाची भूक भागवण्यासाठी होणारे हे स्थलांतर रोखण्यासाठी, स्थानिक स्तरावर उद्योग आणि शेतीपूरक कायमस्वरूपी रोजगाराची निर्मिती करणे, हेच शासनासमोरचे मोठे आव्हान आहे.

आचारसंहितेचे काटेकोर पालन करून शांततेत निवडणूक पार पाडावी-निवडणूक निर्णय अधिकारी माणिक आहेर

शिर्डी नगरपरिषद निवडणूक आचारसंहितेबाबत राजकीय पक्ष पदाधिकारी मार्गदर्शन बैठक संपन्न

दैनिक वादळ वाता
शिर्डी । प्रतिनिधी

निवडणूक प्रक्रियेशी संबंधित राजकीय पक्ष, पदाधिकारी, इच्छुक उमेदवार, अधिकारी व कर्मचारी यांनी आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे व शांततेत निवडणूक पार पाडावी, असे आवाहन शिर्डी नगरपरिषद निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांनी केले.शिर्डी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आचारसंहिता व निवडणूक प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नगरपरिषद मुख्याधिकारी सतीष दिघे, नायब तहसीलदार बाळासाहेब मुळे, पोलीस निरीक्षक रणजित गलांडे तसेच निवडणूक प्रक्रियेत सहभागी अधिकारी, कर्मचारी व विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.श्री. आहेर यांनी बैठकीत निवडणूक आचारसंहितेचे सर्व नियम, प्रचारासाठी लागणाऱ्या विविध परवानग्या,

खर्च मर्यादा तसेच नामनिर्देशन प्रक्रियेतील सूक्ष्म बाबींचे सविस्तर मार्गदर्शन केले. श्री.आहेर म्हणाले, दि. ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता प्रचार थांबणार असून, त्या वेळेपर्यंत सर्व बॅनर, पोस्टर आणि प्रचारसाहित्य हटविणे आवश्यक आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्रचारास सक्त मनाई आहे. धार्मिक स्थळांवर प्रचार करण्यास मनाई असून, प्रचारातील मजकूरात वैयक्तिक टीका, प्रलोभन किंवा धार्मिक भावना भडकवणारे मुद्दे नसावेत.

प्रचार सभांसाठी व तंबू उभारणीसाठी पोलीस व स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रचार कार्यालय, प्रचार वाहन, ध्वनीक्षेपक व हेलिकॉप्टर वापरासाठी स्वतंत्र परवानग्या घेणे बंधनकारक असल्याचे त्यांनी नमूद केले.नामनिर्देशन अर्ज सादर करण्याची मुदत १० ते १७ नोव्हेंबर असून, १७ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंतच अर्ज स्वीकारले जाणार आहेत. अर्ज ऑनलाईन भरून प्रिंट घेतल्यानंतर स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे. प्रत्येक शपथपत्रातील रकाना भरलेला असावा व आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक असल्याचे श्री. आहेर यांनी सांगितले.निवडणुकीसाठी उमेदवारांच्या खर्च मर्यादेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, प्रत्येक उमेदवारास राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या खर्च मर्यादेत खर्च करण्याची परवानगी असून, निवडणुकीनंतर ३० दिवसांच्या आत खर्च अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. मतदार यादीतील नावांबाबत काही मतदारांची नावे दुबार असल्यास आवश्यक ती पडताळणी करून एकच नाव कायम ठेवले जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.सोशल व इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या माध्यमातून निवडणूकीच्या प्रचाराचा व्हिडिओ जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक असून त्याशिवाय इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून व्हिडिओद्वारे प्रचार करता येणार नाही, असेही श्री.आहेर यांनी सांगितले.

देशामध्ये निवडणूक आयोगाने स्वतंत्र यंत्रणा उभारावी-प्रा.बबनराव आंधळे

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

देशामध्ये वारंवार होणाऱ्या प्रत्येक विभागाच्या निवडणूका मग त्यामध्ये सहकार विभाग असेल सार्वत्रिक निवडणूक असेल अशा विविध प्रकारच्या निवडणुका सतत देशांमध्ये सुरू असतात निवडणूक आयोगाची ग्रामपंचायत सरपंच निवडणूक ते खासदारकी निवडणूक इथपर्यंत स्वतःची यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे.१४० कोटी लोकसंख्या असलेल्या या भारत देशामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे विभाग आहेत त्यामध्ये सहकार विभाग आहे. स्थानिक स्वराज्य संस्था सहकार प्रशासन,बँकिंग क्षेत्र अशा सार्वत्रिक निवडणूक या भारत देशामध्ये टप्प्या टप्प्याने पार पडत असतात. भारतामध्ये जन्म आणि मृत्यू यांचे प्रमाण लक्षात घेता निवडणूक आयोगाने त्यांचा पारदर्शक कारभार करण्यासाठी त्यांची स्वतःची यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. लोकशाहीच्या संकेता नुसार निवडणुका शांततेत आणि निर्विघ्न पार पडल्या पाहिजेत यासाठी स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता आहे.गेल्या कित्येक वर्षापासून निवडणूक आयोग शिक्षण विभाग,महसूल विभाग, सहकार विभाग,राज्य सरकारच्या वेगवेगळ्या खात्याचा आणि त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांचा उपयोग करून निवडणुका घेण्याचे काम केले आहे.याशिवाय मतदानाची नोंदणी करण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना घरोघर पाठवून मतदान नोंदणी आणि इतर सर्व कामे करून घेतली जातात. यामध्ये एकबाजूला सदोष निवडणूक आयोगाची कार्यप्रणाली समोर आली आहे.मतदाराचे दुबार नाव अनेक वेळा नावाची नोंदणी होणे,पत्ता बदलल्यानंतर दोन्ही ठिकाणी मतदाराची नोंदणी राहणे,फोटो आणि इतर आवश्यक अपुरी माहिती मतदार यादीमध्ये असणे मतदार यादीतून नाव कमी करण्या साठी अपुरी व्यवस्था असणे मृत्यू पावलेल्या लोकांची नावे यादीमध्ये कायम राहणे या आणि अशा विविध कारणांनी निवडणूक आयोगाच्या मतदार याद्या दोषपूर्ण राहतात या अत्यंत महत्त्वाच्या कामा साठी तात्पुरता कर्मचारी वर्ग घेऊन निवडणूक आयोग कामकाज करतो हे अत्यंत चुकीचे आहे. केंद्रातील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २०१४ पासून अत्यंत क्रांतिकारक आणि लोकहितकारक निर्णय घेतलेले आहेत त्याचा परिणाम आज देशांमध्ये स्पष्टपणे दिसतो आहे. जगाच्या पातळीवर भारताची निर्माण झालेली प्रतिष्ठा या सरकारची फलश्रुती आहे सर्व क्षेत्रात काम केल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी निवडणूक आयोगा ची स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी विशेष लक्ष द्यावे ही विनंती या निवेदनाच्या द्वारे केली जात आहे. निवडणूक आयोगासारखे महत्त्वाचे काम करण्या साठी महसूल खात्या प्रमाणे गाव पातळीपासून निवडणूक आयोग कर्मचारी तालुका आणि जिल्हा निवडणूक आयोगाचे कार्यालय व कर्मचारी विभाग आणि राज्य पातळीवर आयुक्त आणि संचालक दर्जाचे कार्यालय राज्य आणि देश पातळीवर आज काम करत असलेले निवडणूक आयोगाचे कार्यालय आणि अधिकारी अशी निवडणूक आयोगाची स्वतंत्र रचना असली पाहिजे आणि ती कायम स्वरूपी इतर सर्व खात्या प्रमाणे शंभर टक्के अनुदानावर असली पाहिजे त्याशिवाय जन्म मृत्यूच्या नोंदी आणि मतदार याद्या अद्यावत होणार नाहीत.देशाच्या लोकशाहीसाठी आणि प्रगतीसाठी निवडणूक आयोग सक्षम आणि कार्यक्षम असणे अत्यंत गरजेचे आहे याकडे राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे निवडणूक आयोगाची स्वतंत्र रचना आणि कार्यालये कार्यान्वित करावेत अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात येत आहे आपण या मागणीचा सहानुभूती पूर्वक विचार करून योग्य तो निर्णय घ्याल अशी अपेक्षा ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी या निवेदना मध्ये व्यक्त केली आहे.

स्वानंद सार्वजनिक वाचनालयात वंदे मातरम सामुहिक गीत गायन व व्याख्यान कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबदद्ल वंदे मातरम हे गीत सामुहिक गायन करण्यात आले.या सामुहिक वंदे मातरम गायनासाठी आनंदगांव ता.केज जि.बीड येथील ग्रामस्थ,वाचक,हितचिंतक,विद्यार्थी,जेष्ठ नागरीक, युवक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती व सहभाग होता.यावेळी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य,डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांचे व्याख्यान संपन्न आले.अध्यक्षस्थानी शिवदासअप्पा गायकवाड हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, राजाभाऊ बोडखे, शिवाजी घोगले,वामन गायकवाड,दादासाहेब गायकवाड यांचीउपस्थिती होती.डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी वंदे मातरम गीताच्या निर्मीती संबंधी सविस्तर विवेचन करून बंकीमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेले गीत प्रथम रविंद्रनाथ टागोर यांनी गायल्याचे सांगून स्वातंत्र संग्रामासाठी हे गीत प्रेरणादायी ठरल्याचे प्रतिपादन केले.या वंदे मातरम गीताचे पाळेमुळे जनतेत एवढी खोलवर रुजली कि,पुढे चालून हे गीत स्वातंत्र्य चळवळीचे प्रेरणास्त्रोत बनल्याचे प्रतिपादन डॉ.वसुदेवबप्पा गायकवाड यांनी केले. यानंतर दादासाहेब गायकवाड,राजाभाऊ बोडखे,माजी सरपंच रामराजे गायकवाड, शिवाजी घोगले,वामन गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय समारोप शिवदास अप्पा गायकवाड यांनी केला. कार्यक्रमाला गणपती गायकवाड,रामकिसन गायकवाड,सुखदेव गायकवाड,गोरक्षनाथ पुरी,रामचंद्र नांदे, रावसाहेब गायकवाड, नारायण गायकवाड,एस. के.वैरागे,संजय सोनवणे यांच्यासह वाचक,हित चिंतक,विद्यार्थी, युवक, जेष्ठ नागरीक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती व सहभाग होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

पैठण नगर परिषदेचा चा नगराध्यक्ष भाजपचाच होणार-मा.खा.दानवे

दैनिक वादळ वार्ता
पैठण । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी पैठण शहर आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख व सर्व सेल, मोर्चा व आघाडीचे कार्यकर्ता यांचा पैठण नगरपरिषद निवडणूक पूर्वतयारीसाठी मा. खा. रावसाहेब दानवे मा. केंद्रीय मंत्री भारत सरकार व जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मेळावा आयोजित करण्यात आला होता, यात नगरपरिषद निवडणुकीच्या इच्छूक उमेदवारांनी शनिवार दि. ८ नोव्हेंबर रोजी आपल्या समर्थकांसह मोठ्या संख्येने या मेळाव्यात शक्ती प्रदर्शन केले. यावेळी माजी मंत्री दानवे यांनी पैठण नगर परिषेदचा नगराध्यक्ष भाजपचाच होणार आसल्याचे जाहीर केले. मागील निवडणुकीत मी भाषण करताना लक्ष्मी दर्शन ना चा उल्लेख केला म्हणून माझ्यावर निडणुक आयोगाने गुन्हा दाखल केला. हि आठवण पुन्हा पैठण करांना करुन दिली.तसेच नगराध्यक्षा पदासाठी माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे याच्या सौभाग्यवती मोहीनी लोळगे यांना उमेदवारी मिळण्यासाठी औपचारिक घोषणाच केली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, एकनाथ गायकवाड, रेखाताई कुलकर्णी, लक्ष्मण औटे, तुषार शिसोदे, अश्विनी लखमले, सतिश आहेर, अनिल पवार, सुनिल रासणे, विश्वभंर वल्ले, विशाल पोहेकर,तसेच पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

लेखक परमेश्वर बनकर लिखित संत सावता महाराजांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे बीड येथे प्रकाशन मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
पाटोदा । प्रतिनिधी

संत परंपरेचा संदेश,भक्तीचा आदर्श आणि समाज परिवर्तनाचा दीप प्रज्वलित करणारे संत शिरोमणी सावता महाराज यांचे जीवन हे प्रेरणादायी आदर्शाचे प्रतीक आहे. या महान संतांच्या कार्याचा आणि जीवन तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करून लेखक परमेश्वर बनकर यांनी त्यांच्या चरित्रावर आधारित एक मूल्यवान पुस्तक लिहिले आहे.या पुस्तकाचे प्रकाशन समारंभ रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी बीड शहरातील हॉटेल गोल्डन चॉईस येथे सकाळी ११:३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.या सोहळ्यात संत सावता महाराजांचे वंशज ह. भ. प. रविकांत महाराज वसेकर (अरण) यांच्या शुभहस्ते पुस्तकाचे प्रकाशन होणार असून, हा कार्यक्रम संत परंपरेतील एक ऐतिहासिक क्षण ठरणार आहे.या प्रसंगी साहित्य, समाजसेवा आणि संत परंपरेशी निगडित अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात संत परंपरेवर आधारित विचारमंथन, भक्तिगीते, तसेच लेखकास सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्याचा कार्यक्रमही होणार आहे.लेखक परमेश्वर बनकर यांनी या पुस्तकातून सावता महाराजांचे जीवन तत्त्वज्ञान, त्यांच्या कार्याची सामाजिक पार्श्वभूमी, भक्तीतील समतेचा संदेश आणि आजच्या पिढीसाठी असलेले त्यांचे मार्गदर्शन यांचे सुंदर चित्रण केले आहे. त्यांनी सांगितले की, संत सावता महाराज हे केवळ भक्त कवी नव्हते, तर समाजजागृतीचा दीप होते. त्यांच्या शिकवणीने आजच्या युवकांना आणि समाजाला दिशा देणारे कार्य व्हावे, हीच या पुस्तक लेखनामागची प्रेरणा आहे.या प्रकाशनानिमित्ताने सर्व समाजबांधव, संतभक्त, साहित्यप्रेमी व वाचकवर्गाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन लेखक परमेश्वर बनकर यांनी केले आहे. संत परंपरेचा गौरवशाली वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा सोहळा एक प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

आशांना किमान वेतनाचा लाभ सरकारनी द्यावा-कॉ डॉ डी एल कराड

दोन दिवसीय अधिवेशनात विविध ठराव मंजुर

दैनिक वादळ वार्ता
परळी वै । प्रतिनिधी

आरोग्य विभागातील महत्वाचा घटक असलेल्या आशा व गटप्रवर्क यांना सरकारने कायम सेवेत सामावून घ्यावे व सामाजिक सुरक्षा प्रदान करावी यासाठी उखढण कायम आशा व गटप्रवर्क फेडरेशन च्या सोबत राहुन आंदोलनात सहभागी होत असल्याचे मत उखढण चे राष्ट्रीय उपाध्यक्ष कॉ डॉ डी एल कराड यांनी केले आहे.

परळी येथे ८ व ९ नोव्हेंबर रोजी आशा व गटप्रवर्क फेडरेशन चे ४ थे राज्य अधिवेशन उत्साहात पार पडले. यावेळी अधिवेशनाच्या समारोपाच्या भाषणात कॉ डॉ डी एल कराड बोलत होते. पुढे बोलताना कॉ कराड म्हणाले की देशातल्या ३५ टक्के लोकांना घर बांधण्यासाठी स्वतः ची जागा नाही. देशातील ४.५ कोटी लोक अल्पशा उत्पन्नावर काम करतात त्यांना पेन्शन नाही. योजना कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेतले पाहिजे. आशांना सामाजिक सुरक्षा असली पाहिजे. सरकारनी आशांना किमान वेतनाचा लाभ दिला पाहिजे. आशा व गटप्रवर्क संघटना मजबूत करावी लागेल. त्याशिवाय सरकार आपल्या मागण्या मान्य करणार नाही. त्यामुळे यापुढे आशां नी एकत्र येऊन संघटना बळकट करण्याचे आवाहन कराड यांनी केले. यावेळी आशा वर्कर्स यूनियनच्या राज्याध्यक्ष कॉ आनंदी आवघडे, सरचिटणीस कॉ पुष्पा पाटील, सिटु चे राज्याध्यक्ष कॉ एच एम शेख, जिल्हाध्यक्ष कॉ शिवाजी कुरे, सचिव कॉ किरण सावजी, कॉ अशोक थोरात, कॉ प्रभाकर नागरगोजे यांची प्रमुख उपस्थिती होती. दोन दिवस चाललेल्या अधिवेशनात संघटनात्मक बांधनी व सरकारकडे प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत विविध ठराव पारित करण्यात आले. आभार प्रदर्शन कॉ सुवर्णा रेवले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आशा लांडगे, हेमा काळे, अनिता गिराम, छाया रणदिवे, सारिका मुंडे, अनिता चाटे, भाग्यश्री थावरे, उमा वाघमारे, भारती राख, सुवर्णमाला मुंडे, जालिंदर गिरी, शेख जावेद, प्रकाश वाघमारे, बाबासाहेब रोडे, शुभम काकडे आदींनी परिश्रम घेतले.

पुण्य कर्म करण्याकरिता मन शुद्ध पाहिजे-पुज्य भीक्खुनी प्रा.धम्मदर्शना महाथेरी

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा ह्या तीन महिन्याच्या वर्षाकाळात अडीच हजार वर्षापासून भिक्खु संघ तत्कालीन विहारात राहून विद्यार्जन करीत असत व तथागता कडून मिळालेला उपदेश त्या परिसरातील उपासक उपासिकांना समजावून सांगत असतं. तथागतांचा सर्व अनमोल उपदेश पाली भाषेतून आहे. तो सर्व सामान्यांना समजावा म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक वर्ष तथागतांच्या उपदेशांचा सखोल अभ्यास केला व बोधिसत्व बाबासाहेबांनी शेवटचा ग्रंथ दि. बुद्धा अँड हीज धम्मा इंग्रजीतुन लिहिला सर्व भारतीयांना समजावा म्हणून डॉ. भदंत आनंद कौशल्यायन यांनी हिंदीमध्ये त्या ग्रंथाचा अनुवाद केला. नंतर पी ई एस सोसायटीने त्या ग्रंथाचा मराठीत बुद्ध आणि त्यांचा धम्म असा अनुवाद केला. हाच धम्मग्रंथ तथागतांचा उपदेश समजून घेण्या करिता व जगात प्रज्ञा,शील, करुणा मैत्री, बंधूता व न्यायाची निर्मिती होण्याकरता व त्यानुसार आपण आपली आचरण ठेवण्याकरता वर्षावास काळात सामुदायिक वाचन अनेक विहारात केल्या जाते. या तीन महिन्यानंतर त्या ग्रंथ वाचनाचा सांगता समारोप पूज्य भिक्खूंच्या देशानेने केला जातो हाच मार्ग स्वीकारून सांची बुद्ध विहार अंकुश नगर बीड येथे सांगता समारोप प्रसंगी पुज्य प्राध्यापक भीक्खुनी धम्मदर्शनी महाथेरी भीम टेकडी छत्रपती संभाजी नगर यांची धम्मदेशना संपन्न झाली. त्या मंत्रमुग्ध करणाऱ्या धम्मदेसनेत आपल्या मधुर आवाजात उपदेश करताना सर्व बालक-बालिका उपासक उपासिका समजेल अशा भाषेत सांगितले की पुण्य कर्म करण्याकरता मन शुद्ध पाहिजे. मनातील शुद्ध विचारच पुण्यकार्य करण्याकरता प्रवृत्त करतात जोपर्यंत आपण ज्ञानार्जन करीत नाही तोपर्यंत अविद्याने आपल्या जीवनात केलेला अंधार नष्ट होत नाही. तथागताच्या उद्दिष्टाचा मार्ग हा मध्यम मार्ग आहे अंधारातून प्रकाशाकडे. प्रकाशाकडून अति उच्च प्रकाशाकडे वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून, अंधश्रद्धा राग लोभ मोह मत्सर या दुर्गुनापासून दूर राहून प्रज्ञा, शील, करुणा,मैत्री, त्रिशरण पंचशील अष्टांगिक मार्ग व १०पारमितेचे पालन केल्यानंतर जगात स्वातंत्र्य, शांती,बंधुता,न्याय प्रस्थापित होण्यास बहुमोल सहाय्य होऊ शकते व हे जग जे विज्ञानाच्या शोधाने अणुशस्त्र सज्ज आहे ज्या आधारे केव्हाही नष्ट होऊ शकते.ते जर टाळावयाचे असेल तर जगाला आज युद्ध नको तर बुद्ध हवा आहे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. सील सदाचाराच्या वर्तनातून कुशल कर्म घडते व त्यातून पुण्य मिळते. पुण्य विकत घेता येत नाही व मोजताही येत नाही किंवा चोरी हि करता येत नाही परंतु त्या कुशल कर्माचे पुण्यकर्माचे परिणाम मात्र नक्की कसे दिसतात हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. भगवान बुद्धांनी सांगितले आहे की माणसाचा जन्म हा अनमोल देन आहे. ज्याला जन्म आहे. त्याला मृत्यू आहे. तेव्हा जन्माला जसा आनंद मानतो तसेच मुर्त्यूला देखील आनंदाचा एक सोहळा मानावा. मृत्यूनंतर आपण केलेल्या कुशल कर्माचीच आठवण मागे राहते.जगात सर्वात मोठा आशीर्वाद देणारे आई-वडीलच असतात. म्हणून त्यांची सेवा करा व पुण्यकर्म करून दुःखातून मुक्त व्हा. पालकांना स्पष्ट जाणीव करून दिली की मुलांना उच्च शिक्षण द्या पण त्याबरोबरच त्यांच्यावर लहानपणापासूनच सुसंस्काराची करा. म्हणजे ती तरुणपणी व्यसनापासून दूर राहतील व त्रिशरण पंचशील अष्टांग मार्ग दहा पारमिता पूर्णपणे समजावून घेऊन त्याप्रमाणे आपल्या जीवनातील आचरण ठेवतील. तरच त्यांच्या करता संपत्ती कमावण्याच्या कामापेक्षा संतती घडविण्याचे कुशल कर्म आपल्या हातून घडेल. असे समजता येईल त्याकरता डॉ. बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे दर रविवारी आपल्या कुटुंबासह विहारात येऊन धम्म म्हणजे काय, नीती म्हणजे काय, आपल्या कमाईतील विसावा भाग समाजाकरता खर्च करा. याबद्दल चर्चा व विचार विनिमय करता येईल व विहारे ही संस्कार केंद्र कशी व्हावी याबद्दल सांगोपांग विचार विनिमय होऊन समाज उपयोगी कार्य करण्याचे आयोजन करता येईल. हे सर्वांनी मिळून कसे अमलात आणता येईल एकमेकांच्या सहवासातून ठरवता येईल हे आणि असे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु.जालिंदर माने यांनी केले तर प्रास्ताविक आयु ड.राजेश वाघमारे यांनी केले व आभार प्रदर्शन प्राध्यापक किशोर वाघमारे यांनी व्यक्त केले. महिला उपासक उपासिकांनी कार्यक्रमा यशस्वी करण्याकरता परिश्रम घेतले. कार्यक्रमास बीड शहरातील अंकुश नगर परिसरातील बहुसंख्य उपासक उपासिका बालक,बालिका विहार कमिटीचे सर्व सदस्य उपस्थित होते . सरणात्तयने व खीरदान,भोजनदान करून कार्यक्रमाची सांगता झाली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077